किर्लोस्कर वसुंधरा महोत्सव

# पर्यावरण रॅलीत ६५० विद्यार्थ्यांचा सहभाग

## कॅरीबॅगमुक्त पथनाट्याने वेधले लक्ष

संचार प्रतिनिधी

सोलापूर, दि. २५- किर्लोस्कर फेरस इंडस्ट्रीजच्यावतीने सुरू असलेल्या वसुंधरा महोत्सवांतर्गत काढण्यात आलेल्या पर्यावरण रॅलीमध्ये विविध शाळांच्या ६५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. कॅरीबॅगमुक्तीवर सादर करण्यात आलेल्या पथनाट्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

२४ ते २७ जुलै या कालावधीत वसुंधरा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवारी, सकाळी चार हुतात्मा पुतळा येथून रॅलीला प्रारंभ झाला. सहायक पोलीस आयुक्त मोरेश्वर अत्राम यांच्या हस्ते रॅलीचे उद्‌घाटन झाले.

यावेळी संयोजक डॉ. एस. पी. वैद्य, अशोक पाटील, सुभेदार बाबुराव पेठकर, डॉ. विक्रम पंडित, हृषीकेश कुलकर्णी यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

यावेळी 'कॅरीबॅक हटाव, पर्यावरण बचाव'चा नारा देण्यात आला. 'स्वच्छ सोलापूर, ग्रीन सोलापूर'च्या घोषणांनी परिसर दणाणला होता. चार हुतात्मा पुतळा, सरस्वती चौक, नवीवेस पोलीस चौकी, भैय्या चौक, सेंट जोसेफ हायस्कूल, डफरिन चौक, पार्क चौकमार्गे निघालेल्या रॅलीचा फडकुले संकुलात समारोप झाला.



रॅलीमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी 'कॅरीबॅग हटाव पर्यावरण बचाव' असा संदेश दिला. छाया : संदीप

### ९ शाळांचा सहभाग

वसुंधरा महोत्सवांतर्गत काढण्यात आलेल्या पर्यावरण रॅलीमध्ये दिगंबर जैन गुरुकुल, ज्ञानप्रबोधिनी, सिध्देश्वर, सरस्वती, सुरवसे, नूतन प्रशाला, मॉडर्न, कुचन आणि सिंहगड पब्लिक स्कूलमधील ६५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. मॉडर्न आणि जैन गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कॅरीबॅगमुक्तीवरील पथनाट्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.